जिल्हा परिषदांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांकडून वसूल केल्या जाणा-या शुल्काच्या रक्कमेचा भरणाबाबत....

## महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व जलसंधारण विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक:- पंरास-२०१२/प्र.क्र.७४४/वित्त-९**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: २२ जानेवारी, २०१३

**वाचा:**-१) पंचायत राज समितीचा सन २००५-०६ च्या ९ व्या अहवालातील मुद्दा क्र.१.३ च्या अनुषंगाने दिलेल्या शिफारशी.

२) समक्रमांकाचे दि.९ नोव्हेंबर, २०१२ चे शासन परिपत्रक.

पंचायत राज समितीने दिनांक ३१ मे, २००६ रोजीच्या सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या साक्षीच्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्रातील वसूल केली जाणारी शुल्काची रक्कम संबंधीत कंपाऊंडरनी त्याची रोजच्या रोज कॅश बुकामध्ये नोंदणी करण्यासाठी वरिष्ठांची अनुमती घेऊन ती कोषागारात जमा करावी व सार्वजनिक आरोग्य विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ज्या मार्गदर्शक सूचना ठरवून दिलेल्या आहेत, त्यानुसार खरोखरच अंमलबजावणी होते किंवा नाही हे संबंधीत अधिका-यांनी आवर्जून तपासावे अशी शिफारस केली आहे.

त्या शिफारशीच्या अनुषंगाने दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ चे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. तथापि शासनास त्या परिपत्रकात सुधारणा करणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाला होता त्या प्रस्तावावर विचारांती समक्रमांकाचे दि. ९ नोव्हेंबर, २०१२ चे शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येऊन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**परिपत्रक:-** या परिपत्रकाद्वारे सर्व जिल्हा परिषदांना असे निदेश देण्यात येत आहेत की, त्यांच्या अखत्यारीतील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांकडून वसूल केल्या जाणा-या शुल्काच्या रकमेची रोजच्या रोज कॅश बूकमध्ये नोंद करावी व ती रक्कम संबंधीत खात्यात कॅशीअर / कनिष्ठ सहाय्यकांनी वेळच्या वेळी जमा करावी आणि याबद्दलची खातरजमा वैद्यकीय अधिका-यानी नियमितपणे करावी.

smita\Work\Circular

२. तसेच ही रक्कम कोणकोणत्या बाबीवर खर्च करावी याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने ज्या मार्गदर्शक सूचना ठरवून दिल्या आहेत, त्यानुसार त्या रकमेचा विनियोग करण्यात यावा.

३. वरील निदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील. तसेच या अनुषंगाने जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची खबरदारी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१३०११७१६३४०९५७२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

( स. म. वळवी )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:माहितीस्तव अग्रेषित.**

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे जिल्हा आरोग्य अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
संचालक तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
सर्व सह मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा
सर्व जिल्हा उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-२,नागपूर
उप सचिव, कार्यासन पंरा-५ व आस्था-२, ग्रामविकासव जलसंधारण विभाग
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
निवड नस्ती का. वित्त-९